CoverageReport: TCS IT Wiz – Pune Edition

**Publication:**Pune Satta
**Date:**11/08/2014
**Edition:** Pune
**Page No:** 2
**Headline:**TCS IT WIZ 2014 on August 12 in Pune

# टीसीएस आयटी विझ २०१४ ची पुणे फेरी १२ ऑगस्ट रोजी

पुणे- माहिती तंत्रज्ञान सेवा, सल्ला, व्यवसायांकरता आवश्यक सुविधा पुरवणारी आघाडीची कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेस टीसीएएसने टीसीएस आयटी विझ २०१४ च्या पुणे फेरीची घोषणा केली आहे. १२ ऑगस्ट, मंगळवार रोजी टीसीएस आयटी विझ पुण्यातील कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडेल. इयत्ता आठवी ते बारावीतील विदयार्थी (कनिष्ठ महाविदयालयातील पीयु विदयार्थ्यांसहीत) टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेशशुल्क भरण्याची आवश्यकता नाही. टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेली कोणतीही शालेय संस्था एकापेक्षा अधिक संघ पाठवू शकते. एका संघामध्ये फक्त दोनच स्पर्धक असू शकतात. यंदाच्या वर्षी टीसीएस आयटी विझच्या विभागीय फेऱ्या अहमदाबाद, बँगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदौर, कोची, कोलकत्ता, लखनौ, मुंबई, नागपूर व पुणे या चौदा शहरांमध्ये घेतल्या जाणार आहेत. २०१४ सालच्या टीसीएस आयटी विझच्या विभागीय विजेत्यांना विशेष डिझाईन करण्यात आलेल्या ट्रॉफी व पदकांच्या बरोबरीनेच आयपॅड एअर बक्षिस म्हणून दिले जातील. उपविजेत्यांना आयपॅड मिनी बक्षिस म्हणून मिळेल. अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या सहाही संघांना टीसीएसकडून स्पेस पॅक, सिपर्स, इअरफोन्स, युएसबी पेन ड्राइव्ह, स्पीकर्स व इतर अनेक गोष्टी बक्षिस म्हणून दिल्या जातील.